पनवेल (प्रतिनिधी) लोकनेते रामशेठ ठाकूर आणि लोकप्रिय व कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली कॉंग्रेस पक्षाच्या लोकप्रतिनिधींनी आणि कार्यकर्त्यांनी सातत्याने पाठपुरावा करून पनवेल नगरपरिषदेच्यावतीने तक्का गावात उभारलेल्या शिक्षण मंडळाच्या प्राथमिक तक्का शाळा कमांक सातचे लोकार्पण कार्यतत्पर आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते मंगळवारी झाले.

पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखाली असलेल्या कॉंग्रेस आघाडी सरकारच्या माध्यमातून सर्व शिक्षा अभियानांतर्गत २१ लाख ४७ हजार रूपये व पनवेल नगरपरिषदेच्यावतीने ७८ लाख १६ हजार रूपये असे एकूण ९९ लाख ६३ हजार रूपयांचा निधी खर्च करून तीन मजली उभारण्यात आलेल्या या इमारतीत एकूण आठ वर्ग खोल्या, ग्रंथालय, संगणक कक्ष, प्राचार्य व स्टाफ रूम, प्रयोगशाळा अशा सुविधा असून तक्का ग्रामस्थांना सुसज्ज इमारतीची भेट देवून कॉंग्रेस पक्षाने सुसज्ज शाळेचे स्वप्न साकार केले आहे.

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी शाळेच्या इमारतीची पाहणी करून सुंदर व सुसज्ज शाळा असल्याचे सांगून समाधान व्यक्त केले. सुंदर वास्तू उभारणीच्यासाठी योगदान देणाऱ्यांचे त्यांनी आपल्या भाषणातून आभारही व्यक्त केले. ते पुढे म्हणाले की, माजी खासदार रामशेठ ठाकूर साहेबांच्या मार्गदर्शनाखाली विकासाचे ध्येय्य ठेवून आपण सारे वाटचाल करीत आहोत.वाढती लोकसंख्या पाहता इंग्रजी माध्यमाचे शिक्षण देणाऱ्या अनेक खाजगी शिक्षण संस्था मोठया प्रमाणात आल्या आहेत. खाजगी संस्थेच्या शाळेत घेतल्या जाणाऱ्या भरघोस फि मुळे सर्वसामान्यांना हे शिक्षण घेता येत नाही. सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थीसुध्दा हुशार असतो पण त्याला परिस्थितीमुळे दर्जेदार शिक्षण घेण्यास अडचण भासत असते. अशा विद्यार्थ्यांना उत्तम दर्जाचे शिक्षण मिळावे, यासाठी नगरपरिषद शिक्षण मंडळाच्या माध्यमातून सुसज्ज शाळांची उभारली केली जात असतानाच शिक्षणही चांगल्या दर्जाचे मिळावे याकरिता सेमी इंग्लिश, इंग्लिश माध्यम शिक्षण देण्याची गरज असल्याचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगून यासाठी सर्वत्तोपरी मदत करण्याची ग्वाही देवून पनवेलला पिढयानपिढयांचे इतिहास आहे, पनवलेलची ओळख स्वतंत्रपणे राहिली पाहिजे आणि नावलौकिकही अधिकाधिक वाढावे, यासाठी आपण सारे एकजीव होवून कार्य करीत राहू, असेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी म्हंटले.

इंटकचे प्रदेश कार्याध्यक्ष महेंद्र घरत यांनी आपल्या भाषणातून सांगितले की, लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेलमध्ये विकासपर्व सुरू केले. नगराध्यक्ष असताना त्यांनी अनेक निर्णय घेवून विकासकामांचा रथ सुरू ठेवला तो आजही कायम आहे. आमदार प्रशांत ठाकूर वल्गना करत नाहीत, कोणतेही राजकारण न करता कामे करीत असतात, असेही घरत म्हणाले.

यावेळी नगराध्यक्षा चारूशिला घरत यांनी म्हंटले की, लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली विकासकामांचा झंझावात कायम आहे. शहरातील भूयारी गटाराचे काम पूर्णत्वास येत असून अनेक विकासकामे हाती घेण्यात आली आहेत. ५५रस्त्यांच्या डांबरकरणाच्या निविदा काढण्यात आल्या आहेत. त्यापैकी चार रस्त्यांच्या कामाचे भुमीपूजन झाले असून उर्वरित रस्त्यांच्या कामाला लवकरच सुरूवात होणार आहे. त्याचबरोबर नगरपरिषदेच्या सर्व शाळांमध्ये विद्यार्थ्यांकरिता नविन बेंचेस उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवनाच्या उदघाटनाप्रसंगी राज्याचे सामाजिक न्यायमंत्री शिवाजीराव मोघे यांच्याकडे दलितवस्ती सुधारणा निधीची मागणी केली होती. ही मागणी ०३ मार्च रोजी मोघेसाहेबांनी मंजूर केली असून त्यांनी दिड कोटी रूपयांचा निधी मंजूर केला असून प्रभाग ०९ तक्का येथे ८० लाख तर प्रभाग कमांक ७० लाख रूपयांची विकासकामे करण्यात येणार असल्याचीही माहिती नगराध्यक्षा चारूशिला घरत यांनी भाषणातून दिली.

शिक्षण मंडळाचे सभापती वाय.टी.देशमुख यांनी सांगितले की, नगरपरिषदेच्या शाळांच्या इमारती जीर्ण झाल्याने या इमारती नुसत्या दुरूस्ती करण्यापेक्षा नविन बांधल्या पाहिजेत व यातून सर्वसामान्य विद्यार्थ्यांना चांगल्या दर्जाचे शिक्षण मिळाले पाहिजे हा मानस घेवून आम्ही काम करीत आहोत. आमदार प्रशांत ठाकूर व नगराध्यक्षा चारूशिला घरत यांच्या मार्गदर्शनाखाली शाळा इमारती उभारणीच्या कामाला मुहूर्त मिळाला. नगरपरिषदेच्या माध्यमातून धाकटा खांदा येथील शाळा इमारतीची उदघाटन मागिल महिन्यात झाले. आज तक्का येथील भव्य व सुसज्ज इमारतीचे लोकार्पण झाले. येत्या दोन महिन्यात उर्दु शाळेचे काम पूर्ण होईल त्याचबरोबर कोळीवाडा तसेच दगडी व कन्या शाळेसाठीही भव्य स्वरूपातील इमारत बांधण्यात येणार असल्याची माहिती वाय.टी.देशमुख यांनी दिली. येत्या काळावधीत सर्व शाळेत इलर्निंग सरू करण्याबरोबरच सेमी इंग्लिश माध्यम सुरू करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. मराठी माध्यमाकडे विद्यार्थ्यांचा ओढा कमी झाला असला तरी या शाळेतील विद्यार्थी शैक्षणिक तसेच स्पर्धामध्ये कुठेही कमी पडले नाहीत. विविध स्पर्धामध्ये सातत्याने नगरपरिषद मंडळाचे विद्यार्थी उज्ज्वल यश संपादीत करून नावलौककि मिळवून देत आहेत. त्यामुळे आगामी स्पर्धामंध्येही येथील विद्यार्थी कायम यश मिळवतील असेही देशमुख म्हणाले. नगरपरिषदेच्या शाळांना दरवर्षी श्री.रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ तसेच इतर संस्थांकडून शालेय साहित्य मिळत असल्याचेही त्यांनी आवर्जून नमूद करून विद्यार्थी सक्षम झाला पाहिजे याकडे आमचा नेहमी कल राहिल, असेही ते म्हणाले.

यावेळी ज्येष्ठ नगरसेवक व पनवेल शहर कॉंग्रेसचे अध्यक्ष जयंत पगडे यांनी प्रास्ताविकातून तक्का गावात झालेल्या व होणाऱ्या विकासकामांचा आढावा सादर केला. कॉंग्रेसची सत्ता नगरपरिषदेमध्ये आल्यापासून

मोठया प्रमाणात विकासकामे होत असल्याचे त्यांनी नमूद करून प्रभाग नऊमध्ये मोठया प्रमाणात विकासकामे झाल्याचेही त्यांनी सांगितले. येत्या काळातही आमदार प्रशांत ठाकूर, नगराध्यक्षा चारूशिला घरत यांच्या नेतृत्वाखाली मोठया प्रमाणात विकासकामे सुरूच राहतील असे सांगून तक्का गावाला सुंदर वास्तू दिल्याबद्दल जयंत पगडे यांनी आमदार प्रशांत ठाकूर तसेच सहकाऱ्यांचे आपल्या भाषणातून आभार व्यक्त केले.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून रायगड जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष आर.सी.घरत, पनवेल तालुका अध्यक्ष लक्ष्मणशेठ पाटील, उपनगराध्यक्ष मदन कोळी, मुख्याधिकारी डॉ.सुधाकर जगताप, गटनेते अनिल भगत, बांधकाम सभापती राजू सोनी, पाणी पुरवठा सभापती सुभाष भुजबळ, शिक्षण सभापती एकनाथ गायकवाड, महिला व बाल कल्याण सभापती नीता माळी, माजी बांधकाम सभापती तथा नगरसेवक मनोहर म्हात्रे, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे पक्षप्रतोद शिवदास कांबळे, शिवसेनेचे पक्षप्रतोद रमेश गुडेकर, प्रशासकीय अधिकारी सुरेश जाधव, नगरसेवक प्रकाश विनेदार, गणेश पाटील, गणपत म्हात्रे, नगरसेविका कल्पना ठाकूर, सिता पाटील, निर्मला म्हात्रे, स्मिता पाटील, संगिता कांडपाल, प्रार्थना वाघे, श्वेता बहिरा, माजी नगरसेवक प्रभाकर बहिरा, विष्णू बहिरा, देवचंद बहिरा, माजी नगरसेविका वंदना बहिरा, दर्शना भोईर, मावळ लोकसभा मतदार संघ युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष किशोर चौतमल, शिक्षण मंडळाचे सदस्य प्रदीप देशमुख, रमेश जानोरकर, यशवंत फडके, सुधीर मोरे, कॉंग्रेसचे विभागीय अध्यक्ष मनोहर मुंबईकर, गणेश वाघिलकर, अशोक बहिरा, अशोक नाईक, रामदास बहिरा, रेखा बहिरा, कल्पना पगडे यांच्यासह नगरपरिषदेच्या विविध शाळांचे मुख्याध्यापक, ग्रामस्थ आणि विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रविण मोहोकर तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापिका शुभा आव्हाड यांनी केले.